# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/ 750

**अत्यंत महत्वाचे : कालमर्यादा दि. ४/३/१७ ते १०/३/१७**

दिनांक : 04 MAR 2017

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत......**

संदर्भ : १. उ.व तं.शि. विभागाचे शासन निर्णय क्र.टीईएम/२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३/१०/२०१६
२. उ.व तं.शि. विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६०१/तांशि-४, दि.१३/०२/२०१७
३. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. १५/अर्थसं/ईबीसी ऑनलाईन/ २०१६-१७/२४३, दि. २७/०२/२०१७

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार मुंबई विभागांतर्गतच्या सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात येते की, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना"** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यांत आली आहे. सदर योजना ज्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता लागू आहे. संदर्भीय शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतीगृह निर्वाह भत्ता देण्याचे आदेश आहेत. सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात संदर्भीय क्र.२च्या पत्रान्वये शासन स्तरावरुन मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. संदर्भीय क्र.२च्या शासन पत्राची प्रत माहितीस्तव सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्रातील बाब क्र.१ व बाब क्र. ५ च्या अनुषंगाने याआधी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यांत आले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म्स मंजूर करुन घेण्याकरिता दि. ०४/०३/२०१७ ते दि. १०/०३/२०१७ पर्यंत लिंक ओपन करुन देण्यांत आली आहे. तरी सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी वरील मुदतीत त्यांचे नामंजूर झालेले अर्ज ह्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून मंजूर करुन घ्यावेत.

...२.

ही अंतिम संधी असल्याने सर्व संबंधीत संस्थांनी उपरोक्त कालावधीत न चुकता त्यांचे नामंजूर झालेले फॉर्म मंजूर करुन घ्यावेत. तद्नंतर अशा प्रकारचे फॉर्म्स मंजूर करुन घेणे शक्य होणार नाही. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अ. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६०१/तांशि-४.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१७.

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई- ४०० ००१

विषय :- "डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ : आपले पत्र क्र. १५/तंशिस/अर्थसं/व.नि.भत्ता/२०१६-१७/१९२, दि.२३.१२.२०१६ चे पत्र

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रातील मुद्यांस अनुलक्षुन आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) एखाद्या संस्थेकडे वसतीगृह सुविधा उपलब्ध नाही, अशा संस्थेतील विद्यार्थी अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर असेल संस्थेच्या जवळपासच्या परिसरात विद्यार्थी खाजगी ठिकाणी भाडेकरारावर वास्तव्यास असल्यास सदर विद्यार्थ्यास वसतीगृह निर्वाह भत्ता देय आहे का?

- होय.

२) विद्यार्थ्याचे पालक भूमीहीन शेतकरी असेल किंवा त्याच्याकडे महाराष्ट्रात कोठेही स्वत:च्या मालकीची भूमी नसेल परंतु इतर व्यवसाय, नोकरी, व्यापार करत असेल तर अशा विद्यार्थ्यास देय असणार काय?

- नाही.

३) विद्यार्थ्याच्या आजोबांच्या नावे शेती असून ते अल्पभूधारक शेतकरी असल्यास त्या विद्यार्थ्यास देय असेल काय?

- नाही. केवळ ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत, अशाच विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता देय आहे.

४) विद्यार्थ्यांचे पालक नोंदणीकृत मजूर उदा.खाजगी कंपनीत, खाजगी ट्रस्टचा कर्मचारी,व्यावसायिक, शेतात काम करणारा मजूर, रोजंदारीवरचा मजूर यांना देय आहे काय?

**- ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय अभिलेखानुसार "नोंदणीकृत मजूर" आहेत, अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता देय आहे.**

५) वसतीगृहाचे प्रकार शासकीय वसतीगृह, खाजगी वसतीगृह, स्वयंचलित चालविले जाणारे वसतीगृह, ट्रस्टमार्फत चालविले जाणारे वसतीगृह या वसतिगृहांना समाजकल्याण विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे काय किंवा कसे.

**- वसतिगृहास समाजकल्याण विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.**

६) अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर यांना उत्पन्न मर्यादा किती असावी, प्रमाणपत्रामध्ये उत्पन्नाचा उल्लेख करून प्रमाणपत्र घेण्यात यावे किंवा कसे.

**- अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर पालकांकडून उत्पन्नाचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.**

२. उपरोक्त बाबत दि.१३.१०.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती स्वयंस्पष्ट असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(म.मा.मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

c:\users\manoj.kale\desktop\manoj\पत्र.docx